ताराराणी महिला गारमेंट को-ऑप सोसायटी लि, उस्मानाबाद ता. जि. उस्मानाबाद या संस्थेच्या जागा बदलास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. यंत्रमाग- २००९/प्र.क्र.६३/टेक्स-२
१६ वा माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ८ एप्रिल, २०१९.

वाचा :-
१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय, क्रमांक:- यंत्रमाग-१३९८/प्र.क्र.१५८/टेक्स-२, दिनांक २४ फेब्रुवारी, १९९९.
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय, क्रमांक:- यंत्रमाग-१३०६/प्र.क्र.१४१/टेक्स-२, दिनांक २२ जानेवारी, २००९.
३) राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांचे पत्र क्रमांक:- एनसीडीसी ५-८/२००९-एचएलएम(पीएल)/२१०/एसए ३०१३३, दिनांक १६ जानेवारी, २०१४.
४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. यंत्रमाग-२००९/प्र.क्र.६३/टेक्स-२, दि.२१/०३/२०१६.
५) संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्रमांक:-कार्या-४/यंत्रमाग/ब-५६/५४६६/२०१७, दिनांक ९ मे, २०१८.

प्रस्तावना:-

उपरोक्त वाचा क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये ताराराणी महिला गारमेंट को-ऑप सोसायटी लि, उस्मानाबाद ता. जि. उस्मानाबाद या संस्थेस शासकीय भागभांडवल व रा.स.वि.नि. कर्ज या स्वरुपात अर्थसहाय्य वितरीत करण्यात आलेले आहे. सदर अर्थसहाय्य वितरीत करतेवेळी प्रकल्प उभारणी करीता संस्थेने मौजे कडकनाथवाडी ता.वाशी जि. उस्मानाबाद ग्रामपंचायत हद्दीतील गट नं.३४७ अ १ मधील ०.४० हे. आर. जमीन खरेदी केली होती. आता वाचा क्र. ५ अन्वये संचालक (वस्त्रोद्याग) यांनी सदर संस्थेने संस्थेच्या प्रकल्प उभारणी करीता प्रकल्प उभारणीच्या दृष्टीकोनातून आवश्यक सोई सुविधा असलेली मौजे आखरवाई ता.जि. लातूर ग्रामपंचायत हद्दीतील गट नं.६१ मधील ०.४० हे. आर खरेदी केलेल्या जमिनीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विनंती केलेली आहे.. त्यास अनुसरून ताराराणी महिला गारमेंट को-ऑप सोसायटी लि, उस्मानाबाद ता. जि. उस्मानाबाद या संस्थेच्या जागा बदलास कार्योत्तर मंजुरी देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

ताराराणी महिला गारमेंट को-ऑप सोसायटी लि, उस्मानाबाद ता. जि. उस्मानाबाद या संस्थेच्या प्रकल्प उभारणीच्या दृष्टीकोनातून आवश्यक सोई सुविधा असलेली मौजे आखरवाई ता.जि. लातूर ग्रामपंचायत हद्दीतील गट नं.६१ मधील ०.४० हे. आर खरेदी केलेल्या जमिनीस खालील अटींच्या अधिन राहुन कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

१) यापूर्वीच्या जागेवर बांधकामासाठी सादर झालेल्या ई- निविदा प्रक्रीयेनुसारच ज्या कंत्राटदाराला ई-निविदा मंजुर झाली त्यांच्याकडुनच नव्याने खरेदी केलेल्या जागेवर बांधकाम करून घ्यावे व त्याबाबत सदर कंत्राटदाराकडुन संस्थेने बंधपत्र घ्यावे. याबाबतची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग) नागपूर यांची राहील.

२) रा.स.वि.नि. ने जमीन व जमीन विकासाकरीता मंजूर केलेल्या तरतूदीपेक्षा जादा झालेला खर्च संस्थेने स्वनिधीतुन भागविण्यात यावा.

३) मौजे कडकनाथवाडी ता.वाशी जि. उस्मानाबाद ग्रामपंचायत हद्दीतील गट नं.३४७ अ १ मधील ०.४० हे. आर. जमीन विहित पध्दतीने (ई-टेन्डरींग इ.) विक्री करुन येणारी रक्कम संस्थेच्या Designated Account मध्ये जमा करण्यात यावी व सदर रक्कम संस्थेच्या प्रकल्प खर्चाकरिताच वापरण्यात यावी.

४) सदर संस्थेचा प्रकल्प नव्याने खरेदी केलेल्या जमिनीवर उभारणीकरिता लागणारी सर्व प्रमाणपत्रे व परवानग्या याबाबतची पूर्तता संचालक (वस्त्रोद्योग) यांनी करून घ्यावी.

५) या प्रकरणी वाचा क्र. १, २,३ व ४ मधील अटींची व इतर विहीत अटींची पूर्तता करून घेण्याची जबाबदारी संचालक (वस्त्रोद्योग), नागपूर यांची राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०४०८११२५४६४६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Gauri Rahul Mhaske

Digitally signed by Gauri Rahul Mhaske
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e3b06f24c3c5bb026c414c42f865f39144c21fb0f8c3a69c8e6e8dc2c5bb9ddd, serialNumber=b018ba858dd6b20cc7a84f6bc86a86d6a6e9ac3ac56c5dbfcd89f36c74de3e1f, cn=Gauri Rahul Mhaske
Date: 2019.04.08 11:38:35 +05'30'

(गौरी रा. म्हस्के)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
३. सचिव (वस्त्रोद्योग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२.
४. सह सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
५. कार्यासन अधिकारी (रोख शाखा) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग. (३ प्रती)
६. व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली.
७. विभागीय संचालक (पश्चिम), राष्ट्रीय सहकारी विकास निगम, ५ बी.जे.रोड,पुणे.
८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
१०. प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), सोलापूर.
११. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था जिल्हा- सोलापूर.
१२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३. संचालक, लेखा व कोषागारे (संगणक विभाग), नविन प्रशासकीय भवन, मुंबई.
१४. सहसंचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१५. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१६. नियोजन विभाग (कार्या-१४३१), मंत्रालय, मुंबई ३२.
१७. वित्त विभाग (व्यय-२/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई.
१८. अवर सचिव (१७-स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. कक्ष अधिकारी (१६-स/९-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (२ प्रती)
२१. चेअरमन, ताराराणी महिला गारमेंट को-ऑप सोसायटी लि, उस्मानाबाद ता. जि. उस्मानाबाद.
२२. निवड नस्ती (टेक्स-२).